# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, ४th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-४०० ००१ Website:www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२ २२६११०१५

क्र.मराशुवपशिमं/शिष्यवृत्ती/मंजुरी/२०२३-२४/14475/२०२४ दिनांक :-04/01/२०२४

### परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
सर्व मान्यता प्राप्त संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था.
महाराष्ट्र राज्य.

**विषय :** शिक्षण शुल्क समितीने ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाचे शै.व. २०२३-२४ करीता मंजूर केलेल्या शिक्षण शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती म्हणून मान्य करणेबाबत.

**संदर्भ:** १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/शिक्षण-१, दिनांक. १३.१२.२०२२.
२. परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती पत्र क्र.पपअशिशुस/शिक्षण शुल्क समिती/१६/२०२३, दि. २६.०७.२०२३.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मंडळाशी संलग्नीत सर्व ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी “शिक्षण शुल्क समिती” गठीत करण्याबाबतचा शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत निर्गमित करण्यात आला आहे.

सदर परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीने ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाच्या मंजूर केलेल्या शिक्षण शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंडळामार्फत ऑनलाईनरीत्या शिष्यवृत्ती मान्य करण्यात येते. शै.व. २०२३-२४ करीता मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना संदर्भ क्र. २ नूसार शिक्षण शुल्क समिती मार्फत तात्कालिक शुल्क (ॲडॉक) मंजूर करण्यात आलेले आहे. खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | अभ्यासक्रम | शिकवणी शुल्क (Tuition Fees) | विकास शुल्क (Development Fees) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ए.एन.एम. | 40909 | 4091 | 45,000/- |
| २. | जी.एन.एम. | 45455 | 4545 | 50,000/- |

सदर संस्थांना शिक्षण शुल्क समितीकडे तात्कालिक (ॲडॉक) शुल्काचे रु. १५,०००/- भरणे बंधनकारक असेल.

इतर नियमीत संस्थांनी शै.व. २०२३-२४ करीता ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती मान्य करण्याकरीता ऑनलाईनरीत्या विनंती सादर करावी. त्यामध्ये खालील कागदपत्रे अपलोड करावी :

१. Essentiality Certificate / शासन निर्णय.
२. मंडळाचे शै.व. २०२३-२४ करीता संलग्नता पत्र.
३. मंडळाकडे नोंदणी केलेल्या शिक्षकांची यादी.
४. शै.व. २०२३-२४ ची विद्यार्थी नोंदणी यादी.

आणि परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | ए.एन.एम. | 600/- | 800/- | ------------- |
| २. | जी.एन.एम. | 1100/- | 1100/- | 1300/- |

टिप :
महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरीत्या विनंती सादर करतेवेळी वरीलप्रमाणे कागदपत्र सादर न केल्यास आणि शिक्षण शुल्क समितीने शुल्क मान्य न करता महाडीबीटी पोर्टलवर विनंती सादर केल्यास मंडळामार्फत कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

(डॉ. अजय चंदनवाले)
संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
१. मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त, संचालनालय, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती, मुंबई.